पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९३**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १४/१०/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **१४/१०/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहुल तानाजी
६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७. मा.कदम शशिकांत गणपत
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार - अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.इंगळे, मा.चारटणकर – उप आयुक्त, मा.पाटील – शहर अभियंता, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खांडेकर,– सहाय्यक आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.ओंभासे, मा.देशमुख, मा.वाघुंडे – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले– समाज विकास अधिकारी, मा.गोफणे– आरोग्य अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.टकले, मा.धुमाळ – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१६) धन्वंतरी स्वास्थ्य योजना लेखाशिर्षावर तरतुद वर्गीकरणाबाबत.

विषय क्र.१७) सी.पी.एम विद्यार्थ्यांची सेवा अधिग्रहित करून कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी पदावर नेमणूक देणेबाबत.

विषय क्र.१८) प्रभाग क्र.२४ थेरगाव येथील वाकड रोडवरील आठवण हॉटेल चौकात ब्राँझ पुतळा बसविणेबाबत – मा.झामाबाई बारणे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र.१९) प्रभाग क्र.१७ येथील मनपाची छ.शाहू महाराज व्यायामशाळा प्रेमलोक पार्क चिंचवड ही हनुमान सपोर्टस अकॅडमी चिखली या संस्थेस ११ महिने कराराने र.रू.२०००/- सेवाशुल्क महापालिकेकडून घेवून चालविणेस मिळणेबाबत. – मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र.२०) सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकातील कामांसाठी तरतूद वाढ/घट करणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र.२१) ड मुख्यालयातील सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षकातील विकास कामांच्या तरतुदीत वाढ/ घट करणेबाबत.- मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र.२२) प्रभाग क्र.२० येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणेकामी वास्तुविशारद यांची नेमणूक करणेबाबत. – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र.२३) .नंदा सदाशिव पवार यांचे अपिल अर्जाबाबत – मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

विषय क्र.२४) श्री.बाळासाहेब मारूती आल्हाट यांचे अपिल अर्जाबाबत - मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

केंद्रीय मंत्री रामविलास पासवान, खेड-आळंदीचे माजी आमदार सुरेश गोरे, सामाजिक कार्यकर्ते अशोक शिलवंत, अभिनेता अविनाश खर्शीकर तसेच शहरातील कोरोनामुळे निधन झालेल्या व्यक्तींना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

दि.३०/०९/२०२० (दु.२.३०वा) व दि.०७/१०/२०२० (दु.२.१५वा) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१९१) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले

----------

ठराव क्रमांक – ७६०५ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३८२/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे कै.आण्णासाहेब मगर स्टेडीयम व ऑटो क्लस्टर कोविड केअर सेंटरसाठी 04 प्रकारचे लिनन साहित्य खरेदीसाठी अल्पमुदतीची जाहिर सुचना क्र.26/2020-21 नुसार मे.सिद्धी कॉपिअर्स, मे.महावीर कॉर्पोरेशन, मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, मे.आध्या प्रॉपर्टीज, मे.पी शेषाद्री & कंपनी, मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस व मे.ऑस्टीन हेल्थ केअर यांचे प्राप्त झालेले लघुतम दर र.रु.45,22,905/-(अक्षरी र.रू.पंचेचाळीस लाख बावीस हजार नऊशे पाच फक्त) स्विकृत करणेत आलेले असून र.रु.45,22,905/- (अक्षरी र.रू. पंचेचाळीस लाख बावीस हजार नऊशे पाच फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.सिद्धी कॉपिअर्स, मे.महावीर कॉर्पोरेशन, मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, मे.आध्या प्रॉपर्टीज, मे.पी.शेषाद्री & कंपनी, मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस व मे.ऑस्टीन हेल्थ केअर यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६०६ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – भूमि आणि जिंदगी

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/०६/कावि/३८६/२०२०, दि.१७/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

मौजे वडमुखवाडी येथील सर्व्हे नं.१२३/२/१/१/१ सुविधा भुखंड क्षेत्रफळ ४९५.४३ चौ.मी.सुविधा भुखंड ०५ वर्षे कालावधीसाठी सर्वात जास्त मासिक भाडे देणारांस भाडेतत्वावर देणेकामी इच्छुक संस्था,व्यक्ती यांचेकडून ई-निविदा पध्दतीने ई- निविदा नोटीस क्र.०१/२०२०-२१ अन्वये निविदा मागविणेत आल्या होत्या सदर निविदेतील सर्वोच्च निविदाधारकाचे दर दर्शविणारा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मनपा मासिक भाडे दर (शासन व मनपा कराव्यतिरिक्त ) | प्रथम सर्वोच्च निविदाधारकाचे नाव | निविदा धारकाचा देय दर रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | १०,७००/- | साईयोग रेस्टॉरंट | ११,०११/- |

वरील प्रमाणे साईयोग रेस्टॉरंट या निविदाधारकाची सर्वोच्च दराची निविदा स्विकृत करून निविदा अटी शर्ती प्रमाणे पूर्तता करीत असलेने रक्कम भरून घेऊन सदर सुविधा भूखंडाचा ५ वर्षे

कालावधीसाठी ताबा देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ ब नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६०७ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नाविया/०२/कावि/१२५/२०२०, दि.०५/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाचे महिला व बालकल्याण योजने अंतर्गत पवनाथडी जत्रेचे नियोजन पी.डब्लू.डी.मैदान, सांगवी येथे मार्च दि.०४/०३/२०२० ते दि.०८/०३/२०२० या कालावधीत आयोजन करणेत आलेले होते. त्या अनुषंगाने झालेल्या खर्चाची बीले इकडील विभागास सादर केलेली आहेत. सदर पवनाथडी जत्रा कार्यक्रमाकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात "पवनाथडी जत्रा" या उपलेखाशिर्षावरील र.रु.४५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस लाख फक्त) या उपलब्ध तरतुदीस मा.आयुक्त सो. यांचे दि.१६/०१/२०२० रोजीचे मान्य प्रस्तावानुसार संबंधित विभागास खर्च मर्यादित करणेस कळविणेत आले होते. तसेच संबंधित सर्व विभागांना याबाबत कामकाज आदेश देणेत आले होते. तथापि सन २०१९-२० या आर्थिक वर्षामधील पवनाथडी जत्रेकरीता झालेल्या खर्चाची बिले संबंधित विभागांनी वेळेत सादर न केलेने सदरील आर्थिक वर्षातील तरतुद खर्ची न झालेने, अदा करावयाची बिले सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामधील पवनाथडी जत्रा या उपलेखाशिर्षावरील तरतुदीमधून अदा करणे आवश्यक आहे. तरी पवनाथडी जत्रेकरीता संबंधित विभागांचा खर्चाचा तपशील खालील प्रमाणे/पुढील प्रमाणे आहे.

**<u>खर्चाचा तपशील</u>**

| अ.क्र. | विभागाचे नाव | खर्चाचा तपशील | पवनाथडी जत्रेकरीता कळविणेत आलेली मर्यादित खर्च रक्कम | झालेला एकुण खर्च | यापुर्वी अदा केलेली बिलाची रक्कम | उर्वरीत बिल अदा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | स्थापत्य विभाग, ह क्षेत्रिय कार्यालय | मंडप व्यवस्था व स्टॉल उभारणे | १८,००,०००/- | ४२,९१,१८४/- | २९,९९,९९९/- | १२,९१,१८४/- |
| २) | विद्युत विभाग, ह क्षेत्रिय कार्यालय | विद्युत व्यवस्था | १७,००,०००/- | ३८,८३,५६२/- | निरंक | ३८,८३,५६२/- |
| ३) | माहिती व जनता संपर्क विभाग | सांस्कृतिक कार्यक्रम | ४,५०,०००/- | १३,६५,०००/- | १०,९५,०००/- | २,७०,०००/- |
| ४) | सुरक्षा विभाग व अग्निशामक विभाग | सुरक्षा व्यवस्था, पार्किग व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था | १,००,०००/- | १,९७,०००/- | निरंक | १,९७,०००/- |
| **एकुण** | | | ४०,५०,०००/- | ९७,३६,७४६/- | ४०,९४,९९९/- | ५२,४९,७४६/- |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे पवनाथडी जत्रा २०१९-२० करीता झालेल्या संबंधित विभागांचे एकुण बिले व झालेल्या अधिकचे खर्चाबाबतची बिले (उर्वरीत बिले) तसेच संबंधित विभागांची उर्वरीत बिले सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत येणा-या पवनाथडी जत्रा २०२०-२१ या उपलेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुदीमधून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६०८ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१३९८/२०२०, दि.०१/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व महापालिका अधिनियम कलम 63(3) मधील तरतुद विचारात घेता वरील संसर्गजंन्य रोग नियंत्रणात आणणेसाठी, प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असलेने मनपाचे वाय.सी.एम.रुग्णालयामधील रक्तपेढी करीता आवश्यक लागणारे Single Donor Platelet Bag with ACD Solution Kit खरेदी करणेकामी अल्पमुदतीची जाहीर सुचना क्र.13/2020-21 अन्वये मे.श्री एटरप्राईजेस,पुणे यांचेकडुन प्राप्त झालेला निविदा लघुत्तम दर र.रु.7960/- + GSTप्रती किट प्रमाणे Single Donor Platelet Bag with ACD Solution- 500 किट खरेदी करणेकामी एकूण र.रु.39,80,000/- + GST चे खर्चास भारतीय साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महापालिका अधिनियम कलम 63(6)कलम 67(3)(क) नुसार खरेदी करणेकामी कार्योत्तर करारनामा करून कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६०९ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/३५६/२०२०, दि.२३/०९/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत कार्यक्षेत्रात काम करणेचे नियोजन आहे. प्रभाग क्र.३१ येथे कोरोना (कोविड-१९) विषाणुमुळे उद्भवलेल्या रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी प्रतिबंधित क्षेत्रात मंडप व्यवस्था करणेसाठी कामातून कोरोना बाधित क्षेत्र प्रतिबंधीत करणेकामी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना कोव्हिड–१९ चे रूग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.३१ हद्दीत पिंपळे गुरवचा काही भाग व नवी सांगवी इत्यादीचा भाग येत

आहे. सदर भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे इत्यादी कामे दररोज करावी लागत आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत ठेकेदार यांची नेमणूक करणेकरीता मा.अति. आयुक्त-२ यांच्या दि.२३/०६/२०२० च्या मंजुर प्रस्तावानुसार व सुचनेनुसार दरसूची दि.०३/०७/२०२० ते दि.१०/०७/२०२० दरम्यान र.रू.२,९९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्यान्नव हजार फक्त) यावर कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार मे. प्रसाद बबन देवकर यांचेकडून १६.००%कमी इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.३१ हद्दीत पिंपळे गुरवचा काही भाग व नवी सांगवी इत्यादीचा भाग येत आहे. सदर भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्याभागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे ही परिणामकारक दैनंदिन कामे होणे करिता सदर कामासाठी ठेकेदारनेमणे अत्यंत आवश्यक आहे. मे.प्रसाद बबन देवकरयांची ठेकेदार म्हणून कामाकरीता यांची नेमणूक करणेत यावी असे मत आहे . त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगती पथावर आहेत त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे सबब, त्याकामी मे.प्रसाद बबन देवकरयांची नेमणुक करुन त्याकरीता (१६.००% कमी) एवढा दर प्राप्त झालेला आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण कामाच्या रक्कमे पैकी १६.००% कमी या दराने रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१० विषय क्रमांक – ०६

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३०८/२०२०, दि.०६/१०/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.67/1/2019-20 अन्वये प्रभाग क्र.२ मध्ये विविध स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी मे.अण्णा कन्स्ट्रक्शन नि.र.रू.41,68,811/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख अडुसष्ठ हजार आठशे अकरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.41,56,011/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.41,56,011/- पेक्षा 37.99% कमी म्हणजेच र.रु.25,77,142/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.12,800/- = एकुण र.रु.25,89,942/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम

अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६११ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.अक्षेका/आ-२/कावि/३५८/२०२०, दि.०१/१०/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ-क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागामार्फत डेंग्यू/ मलेरिया आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी डास नियंत्रणउपाययोजना राबविणेत येतात. यामध्ये किटकनाशक औषधांची फवारणी करणे, औष्णिक धुरीकरण करणे याचा समावेश आहे. औष्णिक धुरीकण कामासाठी ३ पिक अप व्हॅन/रिक्षा टेम्पो वाहने भाड्याने पुरविणेकामी या कार्यालयाकडील निविदा नोटीस क्रमांक ९/२०१८-१९ अन्वये निविदा प्रसिद्ध करणेत आल्या होत्या. त्यास अनुसरुन प्राप्त निविदांपैकी मे.रामचंद्र एन्टरप्रायजेस, कामगारनगर, पिंपरी-४११०१८ यांनी कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.६,६४,६५०/- पेक्षा १६.१७% कमी (र.रु.५,५७,१००=६५) सादर केलेला दर (र.रु.५९५=१९ प्रतिवाहन प्रति दिन) सर्वात कमी असल्याने आदेश क्रमांक अक्षेका/आ-२/कावि/६२९/२०१९ दि.०२/०७/२०१९ अन्वये त्यांची दिनांक ३/७/२०१९ पासून एक वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.७२१४ दि.१०/७/२०२० अन्वये दिनांक ३/७/२०२० पासून ३ महिने कालाधीसाठी मुदतवाढ देणेत आली आहे. तथापी सदर कामाची निविदा कार्यवाही पुर्ण झाली नसल्याने कामाची निकड विचारात घेता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१२ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/३७८/२०२०, दि.०७/१०/२०२०

विषय - सन २०२०-२१ साठी ब श्रेत्रिय कार्यालयाअंतर्गत तसेच अ क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रभाग क्र.१९ तसेच ग क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रभाग क्र.२१ इ. भागात टँकरने पाणीपुरवठा करणे.

विषय क्र.८ चा विचार दि.२१/१०/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१३ विषय क्रमांक – ०९
दिनांक – १४/१०/२०२० विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/९/कावि/५१४१/२०२०, दि.०७/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

शासन आदेशानुसार संपुर्ण राज्यात कोविड प्रादुर्भावावर नियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी सर्व लोकसंख्येला भेटी देऊन आरोग्य शिक्षण, महत्त्वाचे आरोग्य संदेश, संशयीत कोविड रुग्ण शोधणे तसेच मधुमेह, ह्दयविकार, किडनी आजार, लठ्ठपणा यासारख्या महत्त्वाच्या Co-morbid condition असणा-या व्यक्ती शोधून काढणे, त्याचप्रमाणे बालकांचे लसीकरण व गरोदर मातांवर वेळीच उपचार याचा अंतर्भाव करुन "माझे कुटुंब – माझी जबाबदारी" ही मोहिम दि.१५/०९/२०२० ते १० ऑक्टोंबर २०२० पहिली फेरी व १२ ऑक्टोंबर २०२० ते २४ ऑक्टोंबर २०२० दुसरी फेरी या कालावधीत राबविणेकरीता सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये "माझे कुटुंब – माझी जबाबदारी" मोहिम पहिली फेरी दि.१५/०९/२०२० ते दि.१०/१०/२०२० असे १५ दिवस व दुसरी फेरी दि.१४/१०/२०२० ते २४/१०/२०२० असे १० दिवसामध्ये राबविण्यात येत आहे. "माझे कुटुंब–माझी जबाबदारी" या मोहिमेच्या अंमजबजावणी करीता सहभागी आरोग्य/पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी व सुपरवाईजर (पर्यवेक्षक) प्रति दिन भत्ता र.रु.१५०/- प्रमाणे र.रु.५८,४६,२५०/- (अक्षरी र.रु.अठठावन लाख शेहेचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) व पर्यवेक्षक प्रति दिन भत्ता र.रु.१५०/- प्रमाणे र.रु.३,८६,२५०/- (अक्षरी र.रु.तीन लाख शहाऐंशी हजार दोनशे पन्नास फक्त) खर्च करण्यास अथवा याकामी येणारा प्रत्यक्ष खर्च कोविड १९ या लेखाशिर्षकामधून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१४ विषय क्रमांक – १०
दिनांक – १४/१०/२०२० विभाग – मध्य.सा.भां. वैद्यकीय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/६४४/२०२०, दि.०८/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७२३०, दिनांक १०/०७/२०२० नुसार कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी M/s.Jai Bhawani Enterprises यांनी सादर केलेल्या लघुत्तम दर प्रति कर्मचारी प्रति महाप्रमाणे र.रु.२८,०२१/- नुसार (कमी केलेल्या दरानुसार) डेड बॉडी डिसपोजल करणेकामी २६ कर्मचारी (१६ कर्मचारी कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम व १० कर्मचारी ऑटो कलस्टर) उपलब्ध करुन देणेकामी येणा-या र.रु.२८,०२१/-X२६=र.रु.७,२८,५४६/- प्रमाणे ३ महिनेकरीता

M/s.Jai Bhawani Enterprises यांचे समवेत करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी-शर्तीस अधिन राहून M/s.Medbros Healthcare Pvt. Ltd., यांचे समवेत नव्याने करारनामा करुन व अनामत रक्कम घेवून कर्मचारी उपलब्ध करुन देणेकामी येणा-या र.रु.२१,८५,६३८/-(अक्षरी र.रू.एकवीस लाख पंच्याऐंशी हजार सहाशे अडोतीस फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१५ विषय क्रमांक – ११

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – उद्यान

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता(स्था./उद्यान)यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/३८२/२०२०, दि.०८/१०/२०२०

मा.कार्यकारी अभियंता(स्था./उद्यान) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र 'अ' (१ ते ४) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी/शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागु असल्यास भाववाढ कलमानुसार वृक्षारोपणासाठी मजुर कर्मचारी पुरविणे व त्याअनुषंगिक कामे करणे या कामासाठी निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन आदेश निर्गत केलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१६ विषय क्रमांक – १२

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – स्थापत्य मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/श.अ./तां/४/२०७/२०२०, दि.०८/१०/२०२०

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य मुख्यालयामार्फत पिपंरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणारे रस्ते, पावसाळी पाण्यासाठी वाहिनी व इतर स्थापत्य विषयक कामे, पूल, स्काय वॉक व इमारती यांचे कामाकरिता नि.नो.क्र.२२/१/२०१७-१८ अन्वये Expression of Interest ची निविदा प्रसिध्द करणेत आली होती, त्यास अनुसरुन टप्पा-१ मध्ये प्रपत्र- अ (रस्ते, पावसाळी पाण्यासाठीची वाहिनी व इतर स्थापत्य विषयक कामे – २५ सल्लागार) व प्रपत्र- ब (पूल,स्काय वॉक व इमारती–२४ सल्लागार) यांना सहभागी करून घेणेत आलेले आहे. टप्पा- २ मध्ये मे.अर्थस्केप आर्किटेक्स् अँण्ड कन्सल्टंट्स यांनी विनंती अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करणेत आली. मे.अर्थस्केप आर्किटेक्स् अँण्ड कन्सल्टंट्स यांना नव्याने नियुक्त करणेकामी त्यांच्या कामाच्या वर्गवारी प्रमाणे प्रपत्र- अ-सल्लागार श्रेणी-

२ (रस्ते, पावसाळी पाण्यासाठीची वाहिनी व इतर स्थापत्य विषयक कामे – रक्कम ५ ते २० कोटी मधील कामे व प्रपत्र ब सल्लागार श्रेणी-२ (पूल,स्काय वॉक व इमारती विषयक कामे- रक्कम ५ ते २० कोटी मधील कामे) या प्रमाणे प्रपत्र अ व प्रपत्र ब तयार करण्यात आले आहे. टप्पा-२ मधील प्रपत्र अ व प्रपत्र ब मे. अर्थस्केप आर्किटेक्स् अँण्ड कन्सल्टंट्स यांना पॅनलवर घेणे साठी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१७ विषय क्रमांक – १३

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/२९४/२०२०, दि.०७/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या कोविड केअर सेंटर(CCC) खाजगी रुग्णालय सेंटर/एन.जी.ओ./खाजगी संस्था यांना खाजगी ठिकाणी (CCC) चालविणेस देणेकामी Expression of Interst (EOI)3/2020-21 प्रसिध्द करणेत येवून, सीकॅटेगरी मधील बेडचे संख्येनुसार निविदा मागविणेत आलेल्या होत्या. त्यानुसारतीन महिने कालावधी करीता कामाचा आदेश देणेस, मा.आयुक्त सो. यांनी दि.३१/०८/२०२० रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सीकॅटेगरी अंतर्गत खालील प्रमाणे कोविड केअर सेंटर सुरु करणेस आदेश देणेत आले आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बेड संख्या | स्थळ | मंजुर दर प्रति बेड/ प्रति दिवस | अंदाजित र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | रुबी एलकेअर सर्व्हिसेस | ४०० | बालनगरी, भोसरी | ८५०/- | ३,०६,००,०००/- |

त्यानुसार उपरोक्त तक्त्यात नमूद संस्थेस कोविड १९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता कोविड केअर सेंटर तातडीने सुरु करणेस मंजूर दराने कामाचा आदेश देणेत आला असून, प्रति बेड/प्रति दिवस मंजुर दरानुसार तीन महिने कालावधी करीता उपरोक्त नमुद अंदाजपत्रकीय रकमेसह प्रत्यक्ष होणा-या खर्चास तसेच त्यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१८ विषय क्रमांक – १४
दिनांक – १४/१०/२०२० विभाग – स्थापत्य, बीआरटीएस
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/७१७/२०२०, दि.०७/१०/२०२०

विषय - औंध वाकड सांगवी रस्त्यावरील मुळा नदीवरअस्तित्वातील पुलाशेजारी नव्याने बांधणेत येणा-या पुला करीता पुणे मनपास अर्थ सहाय्य अदा करणेबाबत.

विषय क्र.१४ चा विचार दि.२१/१०/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६१९ विषय क्रमांक – १५
दिनांक – १४/१०/२०२० विभाग – स्थापत्य, बीआरटीएस
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/७२६/२०२०, दि.०८/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत विविध विकास कामे करणेत येत आहेत. त्याअंतर्गत खालील विकास कामांचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात समावेश केला आहे. सदरची कामे करणेबाबत मा.नगरसदस्यांची इकडील विभागाकडे मागणी केली आहे. याबाबत मा.आयुक्त यांचेकडे दि.२१/०९/२०२० रोजी बैठक झाली असुन त्यामध्ये खालील कामे करणेस सहमती दिली आहे. त्यानुसार खालील रस्त्यांची कामे अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसित करावयाची असल्याने त्यासाठी मनपाच्या सल्लागार पॅनेलवर असलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिल टेक्ट प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रकल्प सल्लागाराचे नाव | फी |
|---|---|---|---|
| १ | काळेवाडी फाटा ते एम.एम. शाळे पर्यंतच्या बीआरटी मार्गावरील फुटपाथ व सायकल ट्रॅक अत्याधुनिक पध्दतीने विकसित करणे. | मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिल टेक्ट प्रा.लि. | १.९५% |
| २ | के.एस.बी. चौक ते स्पाईन रोड पर्यंतच्या बीआरटी मार्गावरील फुटपाथ व सायकल ट्रॅक अत्याधुनिक पध्दतीने विकसित करणे. | मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिल टेक्ट प्रा.लि. | १.९५% |
| ३ | सांगवी किवळे बीआरटीएस रस्ता आणि भक्ती शक्ती ते किवळे ४५.०० मी. बीआरटीएस रस्ता यांना जोडणा-या मस्के वस्ती येथील २४.००मी. डी.पी. रस्त्याचे पदपथ विकसीत करणे. | मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिल टेक्ट प्रा.लि. | १.९५% |

तरी मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिल टेक्ट प्रा.लि. यांचेकडून सदर कामाचे निविदापुर्व ०.४५% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.५०% (post tender activity) कामासाठी १.९५% इतक्या दराने सर्व करासह प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७६२० विषय क्रमांक – १६

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – वैद्यकिय (धन्वंतरी कक्ष)

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१४अ/कावि/६४५/२०२०, दि.०९/१०/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१४अ/कावि/६५०/२०२०, दि.१२/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दि.२८/०९/२०२० रोजीचे प्रस्तावान्वये धन्वंतरी स्वास्थ्य योजना लेखाशिर्षावर ७ कोटी वाढीव तरतुद वर्गीकरण करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. धन्वंतरी योजनेअंतर्गतची बिले तातडीने अदा करावयाची बाब विचारात घेता सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात "वैद्यकीय विमा" याकरिता र.रु.१४ कोटीची तरतुद करण्यात आली असून आरोग्य विमा लागू करणेबाबत प्रस्तावित आहे. परंतू अंतिम आदेश देण्यात आलेला नाही. सदर "वैद्यकीय विमा" तरतुदीमधून तुर्तास र.रु.७ कोटी धन्वंतरी निधी योजनेतून उपचारासाठी होणारा खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२१ विषय क्रमांक – १७

दिनांक – १४/१०/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/११/कावि/१०३४/२०२०, दि.०७/१०/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/११/कावि/१०३५/२०२०, दि.१२/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये कॉलेज ऑफ फिजिशियन एँण्ड सर्जन, मुंबई(सी पी एस) या अभिमत विद्यापिठाची मान्यता असलेले ११ विषयातील खाली नमूद केलेले ३३ सी.पी.एस. विद्यार्थी काम करीत असून सदर विद्यार्थ्यांची मुदत दि.३१/७/२०२० अखेर संपुष्ठात येत होती. सदर३३ विद्यार्थी विद्यार्थ्यांपैकी अनुक्रमांक २७ ते ३३ विद्यार्थी अनेक महिनेपासुन गैरहजर असल्याने त्यांना वायसीएम रुग्णालयामध्ये सेवा दिलेबाबत वारंवार सुचना दिलेल्या होत्या. सदर १ ते २६ सीपीएस विद्यार्थ्यांची सेवा ६ महिने कालावधीकरीता अधिग्रहीत करुन कनिष्ठ निवासी पदावर मानधन र.रु.५५,०००/- देय करुन नेमणूक देणे व त्यासाठी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. कोरोना संसर्गामुळे निर्माण झालेली राष्ट्रीय आपती विचारात घेता महाराष्ट्र शासन NotificationNo.2020/CR-58/Arogya-5 Date:14/3/2020 Epidemic Disease Act 1897 कायदा अंमलात आणलेला आहे. त्या अंतर्गत Maharastra Covid-19 Regulation 2020 नियम लागू केलेला आहे. सध्याची कोरोना विषाणू साथरोगाच्या पाश्वभुमीवर तसेच रुग्णांची

कालमर्यादित वाढती संख्या विचारात घेऊन पुरेसे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असणे आवश्यक असल्याने तातडीची बाब म्हणून प्रपत्र अ मधील १ ते २६ सीपीएस विद्यार्थ्यांना कनिष्ठ निवासी, वैद्यकीय अधिकारी या पदावर पुढील ६ महिने कालावधीकरीता एकत्रीत मानधन र.रु.५५,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पंच्चावन हजार) मा.आयुक्त यांचेकडील दि.२०/७/२०२० च्या मान्य प्रस्तावान्वये मानधन र्.रु.५५,००० व र.रु.१०,००० कोविड कालावधीकरीता द्यावयाची वाढ मान्य करुन नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. मा.महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या दि.२७/७/२०२० रोजी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील बैठकीमध्ये विषय चर्चेला आला असता, सदर विषयास सदर बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.ऊक्त सर्व बाबी विचारात घेऊन सदरची बाब तातडीने व कालमर्यादित असल्याने सदरचा विषय मा.स्थायी समितीपूढे कोर्योत्तर मान्यता घेणेस “प्रपत्र अ” मध्ये नमुद १ ते २६ क्रमांकावरील सी पी एस वैद्यकीय अधिका-यांची सेवा अधिग्रहित करुन त्यांना कनिष्ठ निवासी, वैद्यकीय अधिकारी या पदावर ऊमेद मान्यतेने नेमणूक करणेस मान्यता देणेत आली आहे. सी पी एस डॉक्टरांच्या सेवा दि.१/८/२०२० ते दि.३१/१/२०२० अखेर ६ महिने कालावधीकरीता कनिष्ठ निवासी, वैद्यकीय अधिकारी या पदावर मानधन र्.रु.५५,०००/- + १०,००० (कोविड कालावधीकरीता झालेली वाढ) करण्यात आलेली आहे. सदर सीपीएस विद्यार्थ्यांची सेवा अधिग्रहीत करुन त्यांना कनिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी पदावर नियुक्ती देणेस व त्यासाठी येणा-या खर्चास कोर्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२२ विषय क्रमांक – १८

दिनांक – १४/१०/२०२०

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.झामाबाई बारणे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.२४ थेरगाव मधील मंगलनगर, रत्नदिप कॉलनी, शिव कॉलनी, महादेव कॉलनी, गणेशनगर परिसराला आध्यात्मिक वारसा असल्यामुळे व दरवर्षी "वारी" ला पायी जाणा-या लोकांची संख्या विचारात घेता औंध रावेत बा.आरटी.एस. रस्त्यापासून वाकडकडे जाणा-या रस्त्यावर (वाकड रोड) आठवण हॉटेल चौकात वारीची संकल्पना असलेला ब्रॉंझ धातूचा पुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२३ विषय क्रमांक – १९

दिनांक – १४/१०/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१७ येथील मनपाची छ.शाहू महाराज व्यायामशाला प्रेमलोक पार्क चिंचवड ही हनुमान स्पोर्टस अकॅडमी चिखली या संस्थेस ११ महिने कराराने र.रू.२०००/- मनपाकडून येवून

सेवाशुल्क तत्वावर चालविणेस इच्छुक आहे. तरी, प्रभाग क्र.१७ येथील मनपाची छ.शाहू महाराज व्यायामशाळा प्रेमलोक पार्क चिंचवड ही हनुमान स्पोर्टस अकॅडमी चिखली या संस्थेस ११ महिने कराराने र.रू.२०००/- सेवाशुल्क महापालिकेकडून घेवून चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२४ विषय क्रमांक – २०

दिनांक – १४/१०/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामधील खालील कामांमध्ये वाढ/घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव/ उपलेखाशिर्ष | लेखाशिर्ष | पान क्र. | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | प्रभाग क्र.१३ येथील स्मशानभुमीमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे | फ मुख्यालय स्थापत्य विषयक कामे करणे | २७०/३५ | ० | २७२५००० | ० |
| २. | प्रभाग क्र.११ मधील स्वामी विवेकानंद हॉल ते थरमॅक्स चौकाकडे क्राँक्रीटीकरण करणे | स्थापत्य विषयक योजना | ३७/१४९ | ४००००००० | ० | २७२५००० |
| | एकूण | | | | २७२५००० | २७२५००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२५ विषय क्रमांक – २१

दिनांक – १४/१०/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

ड मुख्यालयातील सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ च्या मुळ अंदाजपत्रकात खालील नमुद केलेल्या विशेष योजना विषयक कामांच्या तरतुदीमध्ये वाढ/घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रक | | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | आवश्कतेनुसार होणारी | | सन २०२०-२१ चा सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पान क्र. | अ.क्र. | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पिंपळे गुरव प्रभाग क्र.५७ येथील दापोडी पुल ते तुळजाभवानी मंदिर ते सृष्टी चौकापर्यंतचा १८.०० मी.रूंद | स्थापत्य विशेष योजना (चालू काम) | ३३ | ८७ | १००००००० | १०२००००० | ० | २०२००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रस्त्याचे अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे | | | | | | | |
| २ | पिंपळे गुरव प्रभाग क्र.२९ मधील शेवंताबाई जगताप मनपा शाळेचे विस्तारीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | स्थापत्य विशेष योजना (चालू काम) | ८० | ९४ | १००००००० | ० | २००००० | ९८००००० |
| ३ | प्रभाग क्र.२९ पिंपळे गपरव परिसरातील रस्त्यांचे आवश्यकतेनुसार काँक्रीटीकरण करणे | स्थापत्य विशेष योजना (नविन काम) | ४६ | ३१८ | १००००००० | ० | १००००००० | ० |
| **एकूण रक्कम रूपये** | | | | | ३००००००० | १०२००००० | १०२००००० | ३००००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२६ विषय क्रमांक – २२

दिनांक – १४/१०/२०२०

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.२० मध्ये एच.ए.मैदानासमोर महेशनगर चौकात महापालिकेची मोकळी जागा आहे. सदर जागेवर ब-याच वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारणेची मागणी स्थानिक नागरिकांकडून करणेत येत आहे. त्यानुसार सदर जागेवर शिवाजी महाराजांचा पुतळा उभारून शिवसृष्टी करणेच्या कामास मा.महापालिका समिती ठराव क्र.४४० दि.०७/०९/२०१९ अन्वये मान्यता देणेत आली आहे. तरी सदरचे कामासाठी निविदा पुर्व व निविदा पश्चात कामेकरिता मनपा पॅनेलवरील मे.शिल्पी आर्किटेक्ट अन्ड प्लॅनर्स यांची नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२७ विषय क्रमांक – २३

दिनांक – १४/१०/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

विषय – श्रीम.नंदा सदाशिव पवार, सफाई कामगार यांचा अपिल अर्ज

विषय क्र.२३ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेचेवेळी विषय क्र.२३ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६२८ विषय क्रमांक – २४

दिनांक – १४/१०/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

विषय – श्री.बाळासाहेब मारूती आल्हाट, उपशिक्षक यांचा अपिल अर्ज

विषय क्र.२४ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेचेवेळी विषय क्र.२४ चा विचार करणेत यावा.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.**

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/१०४८/२०२०
दिनांक – १५/१०/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(क्र.उद्यान/४/कावि/३८२/२०२० दि.०८/१०/२०२० विषय क्र.११ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. उदयान विभाग
क्रमांक.उदयान/४/कावि/३८२/२०२०
दिनांक ०८/१०/२०२०

प्रपत्र 'अ'

निविदा कार्यवाही पुर्ण झालेने मा.स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा तारीख | आदेश क्रमांक | आदेशाचा दिनांक | निविदा र.रु. | स्विकृती दर | निविदा खर्चाची मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे.अथर्व स्वयंरोजगार औधोगिक सेवा सह.मर्या. | ०१/०१/२०२०-२१ | मनपाचे अ व फ क्षेत्रीय कार्यालयामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषांगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ५/१०/२०२० | क्र.उदयान/४/कावि/३७८/२०२० | /१०/२०२० | ९,१४,१२०/- | ३.८३ % कमी | ८,७९,१०९/- |
| २. | मे.जनसेवा स्वयंरोजगार सेवा सह.मर्या. | ०१/०२/२०२०-२१ | मनपाचे क व ई क्षेत्रीय कार्यालयामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषांगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ५/१०/२०२० | क्र.उदयान/४/कावि/३८९/२०२० | /१०/२०२० | ९,१४,१२०/- | ३.८३ % कमी | ८,७९,१०९/- |
| ३. | मे.शिवमुद्रा स्वयंरोजगार सेवा सह.मर्या. | ०१/०३/२०२०-२१ | मनपाचे ब व ग क्षेत्रीय कार्यालयामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषांगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ५/१०/२०२० | क्र.उदयान/४/कावि/३७९/२०२० | /१०/२०२० | ९,१४,१२०/- | ३.८३ % कमी | ८,७९,१०९/- |
| ४. | मे.स्वामी विवेकानंद महिला स्वयंरोजगार सेवा सह.मर्या. | ०१/०४/२०२०-२१ | मनपाचे ड व ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषांगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ५/१०/२०२० | क्र.उदयान/४/कावि/३८०/२०२० | /१०/२०२० | ९,१४,१२०/- | ३.८३ % कमी | ८,७९,१०९/- |

Dweghwade
कार्यकारी अभियंता(स्थापत्य/उद्यान)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.

(क्र.स्था/श.अं./तां/४/२०७/२०२० दि.०८/१०/२०२० विषय क्र.१२ चे लगत)

**EMPANELMENT OF PROJECT MANAGEMENT CONSULTANT**

**A-II (5 to 20 Crore) Road and Storm Water Drainage projects, General Civil Engineering Works**

| Sr. No. | Name of Consultant | Details of Experience | Name of Firm/Personnel | Phone No. | PAN & Adhar No. | Email | Address | Years of Registration | Work Experience | Annual Turn Over | Employees Details Eligible or Not Eligible (For Which category | Reason |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Sachin V. Shah | Residential Bldg, Industrial Bldg, Administrative Bldg, Assembly Bldg, Ware House, DPR, **Roads & Infrastructure Projects** | Earthscape Architects & Consultants | 0256224472698 /9422789659 | AFCPS5230F/ 718943563498 | earthscape.sachinshah@gmail.com | 401,402 Vidyadhar Height. 243 Narayan Peth. Laxmi Road. Pune 411030 | 1993 | 24 Years | Average **49.30** Lakh | Eligible For category A-II | NA |

Additional Commissioner,
PCMC, Pimpri-411018

**EMPANELMENT OF PROJECT MANAGEMENT CONSULTANT**

**B-II (5 to 20 Crore) Bridge/ Flyover, FOB, ROB, Skywalk, BUILDING Works and other structures**

| Sr. No. | Name of Consultant | Details of Experience | Name of Firm/Personnel | Phone No. | PAN & Adhar No. | Email | Address | Years of Registration | Work Experience | Annual Turn Over | Employees Details Eligible or Not Eligible (For Which category | Reason |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Sachin V. Shah | Buildings, DPR, **Roads & Infrastructure Projects** | Earthscape Architects & Consultants | 0256224472698 /9422789659 | AFCPS5230F/ 7189 4356 3498 | earthscape.sachinshah@gmail.com | 401,402 Vidyadhar Height. 243 Narayan Peth. Laxmi Road. Pune 411030 | 1993 | 24 Year | Average **49.30** Lakh | Eligible For category B-II | NA |

Additional Commissioner,
PCMC, Pimpri-411018

245

**(क्र.वायसीएमएच/११/कावि/१०३४/२०२० दि.०७/१०/२०२० विषय क्र.१७ चे लगत)**

३१

"प्रपत्र अ"

| अ. क्र. | कनिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी | पदनाम | विभाग | मानधन | कोविड कालावधीकरीता द्यावयाची वाढ | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.स्नेहल भानुदास ठाकरे | DOMS | नेत्ररोग | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| २ | डॉ.प्रीती सोपान गौंड | DGO | Gynac | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ३ | डॉ.गौरव शर्मा | PED | Paediatric | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ४ | डॉ.प्राजक्ता कदम | DCH | | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ५ | डॉ.नुपुर भागचंद कात्रे | DCH | | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ६ | डॉ.शितल साहेबराव खाडे | DCH | | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ७ | डॉ.प्रिया राजेंद्र उमाप | DDV | Skin | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ८ | डॉ.नितीन बळीराम म्हस्के | DDV | Skin | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ९ | डॉ.अर्शिया बींथ अन्सारी | DA | Anesthesia | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १० | डॉ.सुहास शिवाजीराव जगदाळे | DORL | ENT | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| ११ | डॉ.हर्षदा मनोहर बावीसकर (सोनुने) | DORL | ENT | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १२ | डॉ.पंकज ज्ञानदेव वरपे | DORMO | Ortho | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १३ | डॉ.आनंद तानाजी चव्हाण | DORMO | Ortho | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १४ | डॉ.निमेश शिरिष मेश्राम | DPM | Psychiatry | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १५ | डॉ.अविनाश कालीदास सानप | DMRE | X-ray | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १६ | डॉ.महेश प्रल्हाद वाघे | DMRE | X-ray | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १७ | डॉ.दसरेश स्वरुपकुमार मोहन | DORMO | Ortho | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १८ | डॉ.अनिरुध्द सतिश काकडे | DORL | ENT | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| १९ | डॉ.रचित सुनिल सिकची | DPM | Psychiatry | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| २० | डॉ.मानसी सचिन घोडखांडे | DOMS | Opthalmology | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२० |
| २१ | डॉ.निखील निरंजन राठोड | DORMO | Skin | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| २२ | डॉ.मोहीनी लक्ष्मणराव इप्पार | DDV1 | Radiology | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| २३ | डॉ.पदमसिंह बाळकृष्ण साखरे | DMR | Radiology | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| २४ | डॉ.विजया श्रीराम वानखेडे | DMRL | Opthalmology | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| २५ | डॉ.तानीया संजय वानखेडे | DOMS1 | Skin | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |
| २६ | डॉ.आरती श्रीकृष्ण भाड | DDV1 | Radiology | ५५००० | १०००० | १/८/२०२० ते ३१/१/२०२१ |

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८